शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळावर
मा.राज्यमंत्री, आदिवासी विकास यांची
उपाध्यक्ष म्हणून नेमणूक करण्याबाबत...

महाराष्ट्र शासन
आदिवासी विकास विभाग,
शासन निर्णय क्रमांक : आविम-१०९९/प्र.क्र.१/का.३
मंत्रालय विस्तार, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : ७ सप्टेंबर, २००१.

प्रस्तावना :- राज्यातील आदिवासींना स्वयंरोजगार मिळवून देण्याच्या दृष्टीने तसेच तसेच छोटे मोठे उद्योगधंदे सुरु करण्यासाठी आदिवासींना अनुदान, बीजभांडवल, कर्ज इत्यादी बाबींसाठी विविध प्रकारे मदत करणारी वित्तीय संस्था असावी म्हणून स्वतंत्र "शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ" स्थापन करण्याचा निर्णय शासनाने घेतला. त्यानुसार सदर महामंडळाची स्थापना, आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक आविम-२३९६/४५/प्र.क्र.३९/का.३, दिनांक ९ डिसेंबर, १९९८ अन्वये करण्यात आली आहे. शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाचे अध्यक्ष मा.मंत्री, आदिवासी विकास हे आहेत. सदर महामंडळावर मा.राज्यमंत्री, आदिवासी विकास यांची उपाध्यक्ष म्हणून नेमणूक करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाचे विचाराधीन होता.

शासन निर्णय :- शासन आता शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाचे पदसिध्द उपाध्यक्ष म्हणून मा.राज्यमंत्री, आदिवासी विकास यांची नियुक्ती करण्यास मंजूरी देत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(स्वाक्षरी)

( वि. रा. बचेरे )
सहसचिव, महाराष्ट्र शासन,
आदिवासी विकास विभाग.

प्रति,
मा.राज्यपाल यांचे सचिव,
मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव,
मा.मंत्री, आदिवासी विकास यांचे खाजगी सचिव,
सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.

Scanned with OKEN Scanner